# यंत्रमानवांच्या थरार कथा

गुरुनाथ नाईक



परी प्रकाशन

**यंत्रमानवांच्या थरार कथा**

◆

© सुरक्षित

◆

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆


**आवृत्ती :**
२०१६

◆

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| यंत्रमानव | ५ |
| धोकेबाज कारखाने | २३ |
| खाणीतील अपघात | ४२ |
| कमांडो यंत्रमानव | ६१ |
| शत्रूची पाणबुडी | ७९ |
| गुहेतील डाकू | ९८ |
| चोरावर मोर | ११६ |
| किल्ल्याचे रक्षक | १३४ |
| दहशतवाद्यांचा शस्त्रसाठा | १५२ |
| ऑपरेशन सक्सेस | १६८ |




# यंत्रमानव

अलीबागपासून साधारण तीस किलोमीटर अंतरावर ती प्रयोगशाळा बांधण्यात आली होती. 'स्काय मार्क' हे त्या प्रयोगशाळेचे नाव. हे नाव अमेरिका, जर्मनी आणि जपानमध्येही गाजले होते. संगणकावर संशोधन करून त्यात नवनव्या सुधारणा या प्रयोगशाळेत करण्यात येत होत्या. नंतर या सुधारणा जगभर विकल्या जात होत्या. अशी ही जगप्रसिद्ध प्रयोगशाळा एकांतात आणि समुद्राच्या किनाऱ्यावर उभारण्यात आली होती.

राकेश जगताप आणि किशोर पाटील या दोन महत्त्वाकांक्षी तरुणांनी ही कंपनी स्थापन केली होती. दहा-बारा तरुण-तरुणी प्रयोगशाळेत काम करत होते. राकेशच्या जमिनीत ही प्रयोगशाळा होती, तर किशोरच्या जमिनीत दुसरी प्रयोगशाळा होती. या प्रयोगशाळेत विविध कामांसाठी उपयोगात येणारे संगणक बनवण्याचे काम सुरू होते. त्यांनी पाच फूट उंचीचा एक यंत्रमानव बनवलेला होता.

हा यंत्रमानव संगणकाच्या जोडणीचे काम करीत होता. माणसाला अवघड असे काम तो सहजरित्या करत होता. या प्रयोगशाळेत फक्त दोघेच काम करत होते. हा आपला यंत्रमानव जगातील सर्वात प्रगत असा यंत्रमानव आहे असे दोन्ही संशोधक तरुण मानीत होते. कारण, हाच यंत्रमानव स्वतंत्रपणे दुसरे छोटे यंत्रमानव बनवीत होता. अतिशय सूक्ष्म अशा तारा जोडण्याचे कामही तो सहजपणे करीत होता.

सर्वांत लहान यंत्रमानव जो होता तो वॉटरप्रूफ  तसाच फायरप्रूफ होता. पाण्यात तो राहू शकत होता तसाच आगीतही राहू शकत होता. तेलाच्या रिफायनरीत आग लागली किंवा तेलाच्या खाणीत आग लागली, तर स्वत: जाऊन उपाय करण्याची क्षमता त्याच्यात निर्माण करण्यात आली होती.



तो पाण्याच्या तळाला गेला तरी जे दिसते ते संगणकाला पाठवू शकत होता. संगणकाद्वारे सूचना पाठवल्या की, त्यानुसार काम करू शकत होता. त्याच्यावर नियंत्रण जंबोचे होते. जंबोला सूचना दिल्या की, परिस्थितीनुसार जंबो या सूचनांमध्ये स्वत:च बदल करून छोट्या यंत्रमानवाकडून काम करून घेऊ शकत होता. छोटे यंत्रमानव पूर्णपणे जंबोच्या नियंत्रणाखाली तयार झाले होते.

एक दिवस राकेशला यंत्रमानवाची परीक्षा घेण्याची संधी मिळाली. तेल शुद्धीकरण कारखान्यात आग लागल्याची ती बातमी होती. टी. व्ही. वरही बातमी ठळकपणे दाखवण्यात आली होती. घाईघाईत जंबोला काही सूचना 'फीड' करून त्याने दोन संगणक कारमध्ये ठेवले. एक होता एक फूट उंचीचा आणि दुसरा होता दीड फूट उंचीचा. दोघंही मेकॅनिकचे काम करायला सक्षम होते.

कडक बंदोबस्तात त्याला प्रमुख सुरक्षा अधिकाऱ्याकडे नेण्यात आले. अग्निशमन दलाचा प्रमुखही योगायोगाने तिथेच होता. आग पाईपाला लागली होती. तिथे नट ढिले पडल्यामुळे किंवा नीट आवळले गेले नसल्यामुळे तेल झिरपत राहिले. तिथेच कशामुळे तरी आग लागली असावी.

संगणक सुरक्षा अधिकाऱ्याच्या टेबलावर ठेवून राकेशने किशोरशी संपर्क साधला. किशोर त्यावेळी जंबोजवळ होता. जंबोला कोणत्या सूचना द्यावयाच्या याची माहिती राकेशने दिली. नीलम नावाचा यंत्रमानव आगीच्या दिशेने निघाला. जेव्हा तो धुरात गडप झाला तेव्हा संगणकाकडे सर्वांचे लक्ष स्थिर झाले.

संगणकात एक आडवा पाईप दिसत होता. आग दिसत होती. नीलमला जंबो सूचना देत होता. धुरापासून काही अंतरावर पाने ठेवण्यात आले होते. घाईघाईत धुरातून बाहेर आलेल्या नीलमने दोन पाने निवडून नेले. तो काम करतो हे स्पष्ट दिसत होते. नीलमच्या छातीला डोळ्यासारखे भिंग होते. त्यातून हे दृश्य दिसत होते.

एका पान्याने नीलमने एक नट आवळायला सुरुवात केली. नंतर त्याने दुसऱ्या पान्याने एक बोल्ट आवळला. आगीच्या ज्वाळा संगणकावर दिसत होत्या त्या बंद झाल्या.

अर्ध्या तासात धूर नाहीसा झाला. यंत्रमानव कारजवळ येऊन थांबला. जेव्हा त्याला अन्य भागांची माहिती राकेशने दिली तेव्हा संपूर्ण रिफायनरीची पाईपलाईन तपासण्याचे काम त्याच्यावर

सोपवण्यात आले. हा यंत्रमानव ठिकठिकाणचे दोष संगणकावर पाठवत जाईल आणि ते दुरुस्तही करील याची खात्री राकेशने दिली होती.


नीलमचे काम दोन दिवस चालले होते. तेल शुद्धीकरण कारखान्याची देखभाल करणारे इंजिनियर्स अधिकारी संदेश वाचून हादरले होते. कारण, देखभाल करण्यात अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसत होते. कर्मचाऱ्यांमध्येही घबराट पसरली होती. हा यंत्रमानव आपल्या विरुद्ध भरपूर पुरावे देईल ही भीती त्यांच्यात निर्माण झाली होती.

दुसऱ्या दिवशी काय घडले ते कुणालाच समजले नाही. संगणकावरचा सर्व अहवाल उडाला. प्रिंट येतच नव्हते, नंतर नीलम गायब झाल्याचे लक्षात आले. त्याचे काय झाले हेही समजू शकले नाही. सुरक्षा यंत्रणांची धावपळ सुरू झाली. काहीतरी गडबड आहे हे वरिष्ठांच्या लक्षात आले, पण नेमके काय घडले हे मात्र कुणालाच सांगता आले नाही.

राकेश आणि किशोर शांत होते. नीलम गायब झाला म्हणून त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. राकेश तेल शुद्धीकरण कारखान्यात राहिला आणि किशोर निघून गेला. कारण, नीलम सुरक्षित आहे हे जंबोकडून त्याला समजले होते. त्याला कुठेतरी बंद करून ठेवण्यात आले होते.

राकेशने तीन तासांच्या धडपडीनंतर संगणकाला कार्यरत केले. जो अहवाल उडाला होता तो जंबोकडून घेण्यात आला. नाहीतरी नीलमकडून तो थेट येत नव्हता, तर नीलम जंबोकडे पाठवीत होता आणि जंबो प्रयोगशाळेतील संगणकाला तो देत होता. हा संगणक नंतर तेल शुद्धीकरण कारखान्यात तो पाठवीत होता.

✦



नीलम हा अगदीच छोटा संगणक तेल शुद्धीकरण कारखान्याची तपासणी करायला सरसावला. सर्वात प्रथम त्याने पाईपलाईन तपासायला घेतली. जिथे जिथे जोड देण्यात आले होते तिथे तिथे तो जात होता. त्याच्या दोन्ही तळव्यांना लोहचुंबक होता. तेव्हा त्याला वर चढायचे तेव्हाच तो कार्यरत होत होता. जेव्हा उजवा हात त्याला बाजूला काढायचा आहे तेव्हा आपोआप तो हात मोकळा होत होता.

त्याची रचनाच कल्पनेत बसणारी नव्हती. पाईप जोडताना व नंतर काळजी घेताना निर्माण झालेले दोषही नीलमने संगणकाकडे पाठवले होते. जेव्हा जेव्हा तो यंत्रांमध्ये जाई तेव्हा तेव्हा साधेसुधे दोषही संगणकावर नोंद होत होते. अधिकारी वर्गात हे रिपोर्ट पाहून खळबळ माजत होती. तिसऱ्या दिवशी कुणीतरी नीलमवर काळा कपडा टाकला आणि त्याला काम करीत असतानाच पळवले.

पण ज्याने त्याच्यावर काळा कपडा टाकला, त्याचा चेहरा जंबोमधील संगणकात नोंदला गेला होता. त्या चेहऱ्याची प्रिंट राकेशच्या खिशात होती; पण त्याने ती बाहेर काढली नव्हती. कारण, नीलम आपली करामत दाखवील याची त्याला खात्री होती.

नीलमला एका पत्र्याच्या पेटीत बंद करून ठेवण्यात आले होते. कोणत्याही सूचना नसल्यामुळे तो गप्पच होता. रात्री आठ वाजता नीलमने पेटीचा पत्रा फाडायला सुरुवात केली. त्यावेळी कारखान्यात काम करणारा एकूण एक कर्मचारी कार्यालयासमोरील मैदानात बोलावण्यात आला होता. राकेश सुरक्षा अधिकाऱ्याच्या कार्यालयात संगणकासमोर बसला होता. अंधारातही आपल्याला काहीतरी दिसेल याची त्याला खात्री होती. नीलम आपले काम करीतच होता.

नीलमने पेटीचा एक बाजूचा पत्रा गोलाकार असा फाडून काढला. अलगद त्यातून तो बाहेर पडला. कारखान्याचा एक भाग दिसताच नीलम मोकळा झाला याची खात्री राकेशला झाली. नंतर त्याने फोनवरून किशोरला सूचना द्यायला सुरुवात केली. किशोर त्याच सूचना जंबोला देत होता.

नीलम सुरक्षा अधिकाऱ्याच्या कार्यालयात आला. तसाच तो राकेशच्या समोर येऊन थांबला. सुरक्षा अधिकारी मेजर गायकर नीलमच्या मागे येऊन उभे राहिले.

''सर, याला पेटीत बंद करणारा माणूस तुम्हाला हवाय ?'' थंड आवाजात राकेशने विचारले.

''हो. जरूर हवाय.''

शांतपणे राकेशने खिशातून एक कागद काढला. त्याची घडी उलगडून तो गायकरांच्या हातात दिला. ते वेड्यासारखे पाहातच राहिले.

''हा तर देखभाल करणाऱ्या विभागाचा प्रमुख... संगम गायकवाड.''

''त्यानं याला उचलून नेलं होतं.''

''हे चित्र कसं मिळालं ?''

''याच्यासमोर जे येईल ते आम्हाला दिसतं. या संगणकावर पाहा. माझे पाय स्पष्ट दिसतात.''

गायकरांनी मागचा पुढचा विचार न करता गायकवाडला अटक करून आणण्याचा हुकूम सोडला. एक जीप त्याला आणण्यासाठी गेली. व्यवस्थापकीय संचालक गुप्ता साहेबही तिथे येऊन पोहोचले होते. सत्य समजले तेव्हा त्यांचे डोके भडकले. त्यांनी गायकरांना कडक कारवाई करण्याचा हुकूम सोडला होता. गायकवाडला आणण्यात आले. तो वरिष्ठ अधिकारी होता. या प्रकाराने तो हादरला होता. पण जोर कायम होता.

शेवटी कबुली दिल्यावाचून त्याला गत्यंतर उरलेच नाही. दुसऱ्या दिवशी जेव्हा राकेशने संगणकावरून सर्व प्रिंट्स काढून आणल्या तेव्हा देखभाल करणाऱ्या तुकडीचा अक्षम्य निष्काळजीपणा दिसून आला. आग लागायला नेमका हाच निष्काळजीपणा कारणीभूत ठरल्याचे निष्पन्न झाले होते.

सर्व दोष काढल्यानंतरही नीलमने खात्री करून घेतली होती.

माणसापेक्षाही यंत्रमानव अचूक काम करू शकतो हे राकेशने सर्वांना या घटनेने पटवले होते. विज्ञानाची झेप कशी असू शकते याचे प्रात्यक्षिक सर्वांनाच पाहायला मिळाले होते.

✦

मुंबईत एकच घबराट पसरली. ऐन गणेशचतुर्थीच्या तोंडावर दोन बाँबस्फोट झाले आणि आणखी स्फोट होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. त्याच दिवशी संध्याकाळी सात वाजता राकेश आणि किशोर ही जोडी कारमधून कमिशनर साहेबांच्या ऑफिससमोर उतरली. त्यावेळी तिथे कडक बंदोबस्त होता.

दोन अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी केली. येण्याचे कारण विचारले.

''आम्ही हा यंत्रमानव आणलेला आहे. हा स्फोटक वस्तू शोधून काढण्यात पटाईत आहे. याच्यावर कामगिरी सोपवावी अशी विनंती करायला आलोय.'' राकेशने नम्र आवाजात सांगितले.

राकेशला एकट्यालाच कमिशनर साहेबांच्या केबिनमध्ये नेण्यात आले. त्याने प्रथम यंत्रमानवाच्या बातम्या असलेले वर्तमानपत्रांचे अंक साहेबांना दाखवले.

''आता आम्ही काय करू शकतो ?'' राकेशकडे पाहून साहेबांनी विचारले.

''गाडीत संगणक आहे आणि छोटा यंत्रमानव आहे. तो शंभर किलोमीटरवर स्फोटक पदार्थ असले तर सांगू शकतो.''

''खात्री आहे ?''

''हो.''

''तो एखाद्या पोलिसालाही दाखवू शकेल. गनमधील गोळ्यातही स्फोटक असतात.''

''तसं नाही सर, बाँबची रीत वेगळी असते. कोणत्याही प्रकारचा बाँब तो अचूक सांगतो.''

''आमची तयारी आहे.''


त्याचवेळी एक घटना घडली. फोर्टमधील एका इमारतीत बाँब असल्याची अफवा पसरल्यामुळे घबराट माजली. खास पोलीस पथक तयार झाले. नंतर साहेबांनी राकेशला त्यांच्याबरोबर जाण्याची सूचना केली. एक इन्स्पेक्टर त्याच्या दिमतीला देण्यात आला. राकेश त्यांच्याबरोबर घटनास्थळी आला.

त्याने कारमधील बॅटरीवर संगणक सुरू केला आणि यंत्रमानवाला बाहेर सोडून देण्यात आले. त्यावेळी मोबाईलवरून राकेश किशोरला संदेश देत होता. किशोर ते संदेश जंबोला देत होता. जंबोकडून ते संदेश डॉली या यंत्रमानवाला मिळतात हे राकेशच्या लक्षात येत होते.

साधारण तीन फूट उंचीचा डॉली पायऱ्या चढून सरळ पहिल्या मजल्यावर आला. नंतर टॉयलेट अशी पाटी असलेल्या दारातून तो आत शिरला. दोन स्फोटविरोधी पेहराव घातलेले पोलीस त्याच्या मागेच होते. तो सरळ एका कमोडवर चढला. त्याचे दोन्ही हात त्यावेळी लांब झाले होते. बोटे लांब झाली होती. अगदी सहजपणे त्याने पाण्याच्या टाकीचे झाकण उघडले. आतून एक पॉलिथिनची जाड पिशवी त्याने बाहेर काढली. तसाच तो दाराच्या दिशेने आला, त्यावेळी दोन्ही पोलीस पायऱ्या उतरून खाली आले होते.

डॉलीला सारख्या सूचना मिळत होत्या. तो बॉंब घेऊन मैदानाच्या मधोमध आला. त्यावेळी राकेश एका तज्ज्ञ पोलिसाला बॉंब निकामी करण्याची पद्धत विचारीत होता आणि मिळालेले उत्तर संगणकावर टाईप करीत होता. त्यानुसार जंबो डॉलीला संदेश देणार होता.

पंधरा मिनिटात डॉलीने अनेक सुटे भाग करून बॉंब निष्प्रभ करून टाकला. नंतर त्याने कारच्या रोखाने चालायला सुरुवात केली. जेव्हा डॉलीला कारमध्ये ठेवण्यात आले तेव्हा काही धोका नाही असे तज्ज्ञ पोलिसांनी सांगितले होते.



पण डॉली कसला तरी संदेश देत होता. त्याच्या छातीवरचे दोन बारीक दिवे वेगवेगळ्या पद्धतीने पेटत होते. राकेशला याचा अर्थ कळत होता.

''इन्स्पेक्टर, याला बॉंबचा वास लागलेला आहे. ईशान्येकडे तो आहे. अंतर थोड्या वेळात समजेल.'' राकेशने सांगितले.

''आपण जायला हरकत नाही.''

''ड्रायव्हरला सूचना तुम्ही द्या....मी फक्त दिशा सांगत जाईन.'' राकेशने सांगितले. तो खूश झाला होता. डॉलीने त्याच्या मनासारखे आणि अपेक्षेहून चांगले काम केले होते. आताही तो अचूक दिशा सांगत होता.

वांद्रे येथील बकाल वस्तीत कार आली. मागे हत्यारी पोलिसांच्या दोन गाड्या होत्या. मागच्या जीपमधून एक महिला सब इन्स्पेक्टर वरिष्ठांना वायरलेसवरून संदेश देत होती. राकेशने सांगताच कार एका झोपडीसमोर थांबली.

राकेशने डॉलीला खाली सोडले. तिन्ही गाड्या झोपडीपासून दूर जाऊन उभ्या राहिल्या. दोन पोलीस डॉलीच्या मदतीला आले होते. त्यातील एकाने दार उघडले आणि डॉली आत शिरला.

त्यावेळी संगणकावर धोका नसल्याचा संदेश मिळत होता. जिवंत बाँब आत नाही हाच या संदेशाचा अर्थ होता.

दोन तज्ज्ञ पोलिसांनी आत जाऊन खात्री केली. अनेक पेट्यांत बाँब बनवण्याचे साहित्य होते; पण बाँब तयार केलेले नव्हते. झोपडीत कुणीच नव्हते.

एक जीप बोलावून आतील सर्व सामान हलवण्यात आले. तेथील पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी पुढील चौकशीसाठी झोपडीचा ताबा घेतला. स्फोटक पदार्थ घेऊन सर्वजण निघून गेले. त्यावेळी डॉलीचे काम संपले नव्हते.

कारण, पुन्हा त्याच्या छातीवरचा एक दिवा पेटत होता.

अंधार पडायला सुरुवात झाली होती. राकेश ड्रायव्हरला सूचना देत होता. इन्स्पेक्टरही ड्रायव्हरला त्या सूचनांनुसार दिशा सांगत होता. कार बोरीवलीत पश्चिमेला आली. पोलिसांच्या गाड्या दूर होत्या. रांगेत दहा-बारा ट्रक उभे होते. एक अपघात झाल्यामुळे रस्ता रोखला गेला होता.

कारपासून पन्नास-साठ मीटर्सवर स्फोटक पदार्थ असल्याचे राकेशच्या लक्षात आले. इन्स्पेक्टरशी चर्चा करत त्याने डॉलीला खाली सोडून दिले. साध्या वेशातील एक पोलीस डॉलीवर नजर ठेवत होता.



डॉली एका ट्रकच्या मागच्या भागात थांबला. त्यावेळी रात्रीचे साडेआठ वाजले होते. पाहता पाहता डॉली मागच्या बाजूच्या टायरवरून सरळ ट्रकच्या मागच्या भागात आला. तो काय करतो हे कुणालाही दिसणे शक्य नव्हते. ट्रकमध्ये बराच माल भरलेला होता.

इन्स्पेक्टरने वायरलेसवरून संदेश देऊन मागच्या जीपमधील पोलिसांना ट्रकच्या पुढच्या भागात बसलेल्या दोघांना अटक करण्याचा हुकूम सोडला. कारण, गडबड झालीच तर, ते पळून जाण्याची शक्यता होती.

काही पोलीस नंतर ट्रकवर चढले. टॉर्चच्या उजेडात ते डॉलीला शोधीत होते, तर डॉली एक कातड्याची बॅग बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत होता. पोलीस घाबरले होते. आत असलेल्या बाँबचा स्फोट झाला तर....दोघेजण उडी घेऊनच ट्रकपासून दूर झाले.

डॉलीने ट्रकातच बॅग फाडली. आतील बाँब

त्याने फ्यूज काढून निकामी बनवला. तसाच तो डाव्या हातात पकडून खाली उतरला. त्यावेळी तो निकामी बाँब हातात घेऊन पाहणारे पोलीस हादरले होते. त्यांना या बाँबची ताकद माहीत होती. त्या बाँबचा स्फोट आणखी पंधरा मिनिटांनी झाला असता.

हा स्फोट झाला असता तर मागचे व पुढचे दहा-बारा ट्रक उडाले असते. शिवाय रस्त्याला भलामोठा खड्डा निर्माण झाला असता. गजबजलेल्या भागातून तो जात असता तर फार मोठी प्राणहानी होऊ शकत होती. डॉलीने एक संकट टाळले होते.

राकेश त्याला घेऊन प्रयोगशाळेत आला तेव्हा एक वाजून गेला होता. डॉलीला त्याच्या जागी ठेवून तो घरी जाण्यासाठी बाहेर आला तेव्हा ड्रायव्हर निघून गेला होता. वॉचमन तेवढा फाटकाजवळ होता. किशोर तर केव्हाच घरी गेला होता. कार घेऊन राकेश घरी गेला. वॉचमनने फाटक बंद करून घेतले.

पहाटे पाच वाजता अचानक तो गडबडून जागा झाला तेव्हा फोन वाजत होता. त्याने घाईघाईत रिसीव्हर कानाला लावला.

''सर, प्रयोगशाळेत काहीतरी गडबड आहे.'' वॉचमनने घाईघाईत घाबऱ्या आवाजात शब्द उच्चारले.

''कसली ?''

''कुणीतरी किंचाळला होता.''

''कोण ?''

''माहीत नाही सर. दोन गोळ्याही झाडण्यात आलेल्या आहेत.'' वॉचमन बराच घाबरला होता.

''भोसले, मी निघतो...तुम्ही पोलीस स्टेशनवर फोन करा.'' राकेशने घाईघाईत सांगितले. नंतर त्याने किशोरला फोन केला. पाच-सहा मिनिटांतच तो कारमध्ये बसला तेव्हा त्याचे डोके चढले होते.

भणाणलेल्या अवस्थेतच तो प्रयोगशाळेच्या आवारात आला. भोसले वॉचमन घाईघाईत कारजवळ आला. तो सुद्धा गोंधळलेला होता.

प्रयोगशाळेत अंधार होता. बाहेरचेच बटण खाली करून त्याने दिवे पेटवले, पण कुलूप काढून आत गेला नाही. तो आपल्या ऑफिसात शिरला. त्याचवेळी किशोरही येऊन पोहोचला होता. काही न बोलता दोघेही एका संगणकासमोर बसले. किशोरने जंबोशी संपर्क साधला आणि आत धोका नाही याची खात्री करून घेतली.

आत पडलेली दोन माणसे दिसत होती. जंबो संगणकावर प्रत्येक दृश्य त्यांना दाखवत होता. निकामी केलेला बाँब होता. इतस्तत: गन्स होत्या.

पोलीस आले. किशोरने भोसलेकडे चावी देऊन प्रयोगशाळा उघडण्याची सूचना केली. पोलीस आल्यावाचून आत जायचे नाही असे किशोरनेच राकेशला सांगितले होते.